# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**डॉ. संजयकुमार दळवी**
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
**प्र. कार्यक्रम समन्वयक**

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/१५५/१४ दि. १९/०९/२०१४

तात्काळ

कालमर्यादा

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे-४११ ००७.**

**विषय : विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये तसेच विद्यापीठाच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत...**

**संदर्भ :** १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग -संकीर्ण/प्र.क्र.४८-१४/आस्था-२, दि. १७.०९.२०१४
२. युएनआय/(३८/१४/-) स्वच्छतागृहे/विशि-१, दि. १८/०९/२०१४

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालय/संस्थेच्या परिसरात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच महिलांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध नसल्यास सदर स्वच्छतागृहे बांधण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

सदर स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्याकरीता आऊट सोर्सींग करण्यात येईल का? याबाबतची संपूर्ण माहिती मा. कार्यक्रम समन्वयक,, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या कार्यालयात कोणत्याही परिस्थितीत तात्काळ पाठविण्यात यावी. सदर माहिती सोबत दिलेल्या पत्रातील तक्त्यानुसार माहितीची सॉप्ट कॉपी Excel Format मध्ये nss@unipune.ac.in या मेल आयडीवर मेल करण्यात यावी. अधिक माहितीसाठी सोबत दिलेल्या पत्राचे अवलोकन करण्यात यावे. ही विनंती

कळावे, धन्यवाद !

*सोबत : सहसचिव, महाराष्ट्र शासन पत्र*

१९/९

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

तात्काळ
कालमर्यादा

# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४८-१४/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक : १५.९.२०१४

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे-७.
आवक क्र.-आर/ 2806
दिनांक- 18/09/14
जावक दिनांक- 18/09/14
विभाग- Co-ordinator N.S.S.

प्रति,

**संचालक** (उच्चशिक्षण / तंत्र शिक्षण / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/ ग्रंथालय / कला )
महाराष्ट्र राज्य.
**कुलगुरु,सर्व अकृषिक विद्यापीठे**,महाराष्ट्र राज्य.

राष्ट्रीय सेवा योजना
आवक 116
दिनांक 18/9/14

विषय : विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये तसेच विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत...

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाबाबत मा.प्रधान सचिव (उ.व तं.शि.) यांची दिनांक १५.९.२०१४ ची टिप्पणी कृपया पहावी.

%

या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये व संचालनालये तसेच सर्व विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहाच्या सुविधा करण्यात याव्यात. विद्यापीठांनी सर्व शिक्षण संस्था / महाविद्यालयांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत संबंधितांना कळवावे व स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्यासाठी आऊट सोर्सिंग करता येईल का ? याबाबतची माहिती मा.प्रधान सचिवांना उपलब्ध करुन द्यावयाची असल्याने कोणत्याही परिस्थितीत दोन दिवसात पाठविण्यात यावी, ही विनंती. याबाबत प्राधान्याने माहिती द्यावी.

आपली,

( शैला तारगे-पाटील)
सहसचिव,महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे/कालमर्यादा

Mr. R.V. Patil, E.E./
Co-ordinator-N.S.S.

18.9.14

प्रत त्वरीत कार्यवाहीस्तव :
**सहसचिव / उपसचिव,**
(महाविद्यालयीन शिक्षण / विद्यापीठ शिक्षण / व्यवसायशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

७३०१४७-२
१५।९।१४

<u>उच्च व तंत्र शिक्षण विभाग</u>
दिनांक १५ सप्टेंबर, २०१४

विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये तसेच सर्व विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृह आहेत किंवा कसे, याची खात्री करण्यात यावी. नसल्यास त्या ठिकाणी अशा सुविधा करण्यात याव्यात. तसेच विद्यापीठांनी सर्व शिक्षण संस्था/ महाविद्यालयांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत संबंधितांना कळवावे व स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्यासाठी आऊट सोर्सींग करता येईल कां? याबाबतची माहिती मला तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

( डॉ. संजय चहांदे )
प्रधान सचिव

सह सचिव (आस्थापना)

कार्य (आस्था-१)
कार्य आस्था-२

१५/९

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
www.dhepune.gov.in E-Mail- dhepune@yahoo.co.in.
फोन नंबर -०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स नंबर ०२०/२६१११११५३

क्रमांक - युएनआय/(३८/१४-)/स्वच्छतागृहे/विशि-१ दिनांक- १८ सप्टे २०१४

**तात्काळ/कालमर्यादेत**

**ई-मेलव्दारे**

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय- विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये तसेच विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत.**

**सदंर्भ-** शासनपत्र क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४८-१४/आस्था-२, दिनांक १७ सप्टे २०१४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये व संचालनालय तसेच सर्व विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या सुविधा करण्यात याव्यात. विद्यापीठांनी सर्व शिक्षण संस्था/महाविद्यालयांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत संबंधितांना कळवावे व स्वच्छतागृह स्वच्छ राखण्यासाठी आऊट सोर्सिंग करता येईल का? याबाबतची माहिती मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सोबत शासन पत्राची प्रत अवलोकनास्तव जोडण्यात येत आहे.

खालील मुद्यांच्या आधारे आपल्या विद्यापीठ परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या सुविधांबाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

| अ.क्र. | महिला प्रवर्गाचा तपशिल. (संख्या) | स्वच्छतागृहांची संख्या | स्वच्छ करण्यासाठी नियुक्त कर्मचा-यांची संख्या.(नियमित असल्यास) | आऊट सोर्सिंगव्दारे |
|---|---|---|---|---|
| १. | महिला अध्यापक | | | |
| २. | महिला अध्यापकेत्तर कर्मचारी | | | |
| ३. | विद्यार्थिनी | | | |

महिला स्वच्छतागृहाचे प्रमाण ५० महिला/विद्यार्थिनीसाठी ०१ हे प्रमाणभूत मानावे.

महिला अध्यापक व कर्मचारी यांची सध्याची संख्या गृहित धरावी.

१. विद्यापीठ परिसरामध्ये महिला अध्यापक अध्यापकेतर व विद्यार्थिनी यासाठी स्वच्छतागृहांची सुविधा वरील निकषानुसार पुरेशा प्रमाणात आहे का?

२. नसल्यास, त्याठिकाणी निकषानुसार स्वच्छतागृह बांधण्याबाबत नियोजन करण्यात यावे व केलेले नियोजन या कार्यालयास अवगत करावे.

३. विद्यापीठातील स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्यासाठी विद्यापीठात कोणती कार्यपध्दती अवलंबली जाते.

४. स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्यास आऊट सोर्सिग व्दारे व्यवस्था करता येईल का?

५. स्वच्छतागृहे पुरेशी असणे व स्वच्छ असणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

उपरोक्त माहिती निश्चितपणे दि.१९ सप्टेबर २०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत संचालनालयाच्या ई-मेलवर उपलब्ध करुन देण्यात यावी.

मा.प्रधान सचिव यांचे विषयांकित निर्देश विचारात घेता निश्चित स्वरुपाची अचूक माहिती कालमर्यादेत उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करावी.

18/9/14

(डॉ.वि.रा.मोरे)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.